# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५

## (सकाळी ०९.४५ ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **श्री. अर्जुन खोतकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जालना शहरलगत असलेल्या शासकीय जमिनीवर बनावट सर्व्हे क्रमांक निर्माण करणे, खोटे दस्तऐवज तयार करुन जमिनीवर अतिक्रमण करणे, परस्पर विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे, शहरातील भूमिअभिलेख कार्यालयातील सर्व्हे क्रंमाक ५५७ पर्यंत शासकीय दस्तवेजात नोंद असून नव्याने ५५८, ५५९ व ५६० हे सर्व्हे नंबर निर्माण करुन शासकीय जमिनीचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात स्थानिकांनी जिल्हा सत्र न्यायालयात केलेल्या याचिकेमार्फत जिल्हाधिकारी, जालना यांनी केलेल्या निवेदनामध्ये जिल्हा भूमीअभिलेख कार्यालयातील आकारबंदातील नमूद सर्व्हे क्रमांक ५५७ एवढीच नोंद असल्याचे नमूद असणे, यासंदर्भात औरंगाबाद खंडपीठामार्फत १९९८ मध्ये नेमलेल्या फाटक आयोगाने याची चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जालना यांना आदेशित केले असून त्यांनी सादर केलेल्या निवेदनात सर्व्हे क्र. ५५७ इतकेच असल्याचे नमूद असणे, तरी देखील एन.ए. ले-आऊट, पी.आर.कार्ड, सेलडिड बनविणे, तत्कालीन महसूल मंत्री यांच्याकडे तक्रार दाखल करुन तद्‌संबंधी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, जालना यांना संबंधितांवर चौकशी करुन कारवाई करण्याबाबतचे आदेश देवून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार दाखल करुन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, या गैरव्यवहाराची रक्कम संबंधित अधिकारी यांच्यामार्फत वसूल करुन कारवाई होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

रोटा/एचबी ११११-१ (२७००-०३-२०२५)

**(२) श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"दिनांक ५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास पंढरी धानोरा रोड बीड येथील उद्यान विकसित करण्यासाठी नगरपरिषद बीडला शासनाकडून मंजुरीसह वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत ५ कोटीचा निधी वितरित करण्यात आलेला असणे, १६ महिन्यांच्या कालावधीनंतर प्रत्यक्षात दि.२९.१०.२०२१ रोजी प्रशासकीय मान्यता होण्याअगोदरच दि.२६.०४.२०२१ रोजी नगरपरिषद, बीडने कार्यारंभ आदेश पारित करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशामध्ये अनियमितता दिसून येत असल्याने स्था. लोकप्रतिनिधी यांच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी बीड, नगरपरिषद बीड यांना कळविण्यात येणे, तथापि दि.१०.१२.२०२१ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदरचा निधी नगरपरिषद बीड ऐवजी नगरपरिषद परळी वै. यांना नियमबाह्य वर्ग करून, बीड नगरपरिषदेवर अन्याय कारणे, परिणामी बीड नगरपरिषदेतील जनतेला हक्काचा वाटा न मिळाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेली चीडीची भावना, असंतोष, याप्रकरणी स्था. लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार तथा तक्रार नोंदवून सुद्धा सहआयुक्त, न.प. प्रशासन विभाग, बीड येथील अधिकारी व मुख्याधिकारी, नगरपरिषद, बीड यांच्यावर अद्याप कारवाई न होणे, परिणामी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) सर्वश्री. साजिद पठाण, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"अकोला शहरात अमृत योजनेअंतर्गत भूमिगत गटार योजनेस दिलेली मंजूरी, या कामाचे सर्व्हेक्षणही पूर्ण होणे, सदर कामाकरिता शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांचे खोदकाम करण्यात येणे, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता अकोला महापालिकेने ७३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनास सादर करणे, सदर प्रस्तावास अद्याप मंजूरी न मिळणे, परंतु जवळपास ९० टक्के काम हे अकोला (पश्चिम) मतदार संघातील असून सदर भागापैकी कांही भाग गलिच्छ वस्ती सुधार (स्लम) व शहरी योजनेमध्ये येत असणे, या रस्त्यावरुन वाहतुकीबरोबर लोकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे येथील रस्त्यांचे काम प्राधान्याने हाती घेणे गरजेचे असणे, शासनाने भूमिगत गटार योजनेच्या दुस-या टप्प्यातील पहिल्या टप्प्यासाठी शासनाने ६८३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करणे, भूमिगत गटार योजनेकरिता अनेक प्रमुख रस्त्यांची खोदाई होणार असल्याने प्रथम रस्ते दुरुस्तीकरिता निधी शासनाने मंजूर करुन तात्काळ कार्यारंभ आदेश देण्याची आवश्यकता, सदर निधी वेळेत उपलब्ध न झाल्यास नागरिकांना वाहतूकीच्या समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता, अपघात वाढण्याची शक्यता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, उक्त अमृत योजनेअंतर्गत करण्यात येत असलेल्या कामास प्रथम रस्त्याच्या दुरुस्तीकरिता निधी मंजूर करण्याची

आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून त्वरित अकोला महापालिकेने ७३५ कोटी रुपयांचा सादर केलेल्या प्रस्तासाव मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(४) **डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. नानाभाऊ पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, अमित झनक, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री.विकास ठाकरे, संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सांगली, मिरज, कुपवाड महापालिकांनी नवीन वाढीव घरपट्टीच्या मागणी नोटीसा नागरीकांना बजावल्या असून ही बिले अवास्तव आणि अन्यायकारक असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे, याबाबत नागरीकांमध्ये रोष असणे, येथे घरपट्टीचे दरपत्रक २००३-०४ मध्ये लागू करण्यात आले असून ते मान्य करताना महासभेची मान्यता घेतलेली नसणे, अशा दरपत्रकानुसार आजपर्यंत घरपट्टी अकारली जाणे, ही अन्यायकारक असणे, त्यामुळे यातील संपूर्ण टक्केवारी, कर हिस्सा आणि त्यानुषंगाने धोरण याबाबत सर्वंकष विचार व्हावा व त्यानुसार नवे कर धोरण अंमलात आणावे, अशी मागणी होत असणे, तसेच सांगली येथील ड्रेनेज योजना २०१२ मध्ये मंजूर होऊन दि. ३१ डिसेंबर,२०२५ पर्यंत पूर्ण करण्याची हमी शासनाने घेणे, पण २०२५ वर्ष उजाडले तरी अद्याप ड्रेनेज योजना कार्यान्वित झालेली नसणे, याशिवाय सांगली महापालिका क्षेत्रातील १५ रस्ते मुदतपूर्वीच खराब होणे, येथे रस्ते डांबरीकरणावर मोठा खर्च होणे, मात्र दीड-दोन वर्षातच रस्ते खराब होण्याचे मोठे प्रमाण दिसून येणे, त्यामुळे नागरीकांच्या तक्रारी वाढणे, येथील महापालिका क्षेत्रात अनेक समस्या असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. भीमराव केराम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर शहर वसविणारे नागपूर नगरीचे संस्थापक गोंडराजे बख्त बुलंदशहा यांच्या समाधीचे संवर्धन करण्यासाठी ९ कोटी ७२ लाखांचा आराखडा नागपूर सुधार प्रन्यासने राज्य शासनाकडे पाठविला असणे, त्याला नऊ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होऊनही विकास झाला नसल्याची खंत स्थानिकांकडून व्यक्त केली जात असणे, राज्य शासनाकडून अद्याप मान्यता न आल्याने काम थंडावले असल्याचे निदर्शनास येणे, येत्या अर्थसंकल्पात निधी मंजूर करावा आणि सक्करधरा येथे असलेल्या या समाधी स्थळाचे कामाला गती मिळावी अशी मागणी आदिवासी समाज बांधवांकडून करण्यात येत असणे, नागपूर सुधार प्रन्यासने याची दखल घेत

संवर्धनाची प्रक्रिया हाती घेतली असणे, यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी कशा सोडविता येतील हे पाहण्याची आवश्यकता समाधीचे संवर्धन होऊन नागपूरचा इतिहास सर्वांना माहिती व्हावा यासाठी हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे आवश्यक असणे, नागपूर सुधार प्रन्यासने हा प्रस्ताव राज्याच्या नगर विकास विभागाकडे पाठविला असल्याचे निदर्शनास येणे, मात्र निधी मंजूर झाला नसल्याने पुढील विकास होऊ शकला नसणे, राज्य शासनाच्या येत्या अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी आदिवासी विकास परिषदे तर्फे करण्यात येणे, यास्तव सकुरधरा येथील समाधी स्थळाचे संवर्धन करणे कामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) सर्वश्री. प्रविण दटके, मोहन मते, प्रताप अडसड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ४४०७ कर्मचारी ऐवजदार या पदावर कार्यात असणे, शासनाने दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजी या बाबतीत परिपत्रक प्रसिद्ध केले असणे, या शासन निर्णयात ज्या ऐवजदारांना २० वर्ष झाली असतील अशा ऐवजदारांना कायम करण्याबाबतचा उल्लेख असणे, सन २०१९ चा शासन निर्णय हा ऐवजदारांना परमनंट करण्याबाबतचा असताना ऐवजदारांनी सेवा दिल्यानंतर त्यांच्या वारसांना मात्र लाड कमिटीचा कोणताही लाभ देण्याचा मुद्दा या शासन निर्णयात नसणे, त्यामुळे लाड कमिटीच्या मार्फत या ऐवजदारांना आवश्यक लाभ देणे, ऐवजदारांना वारसा पद्धती लागू करणे, ऐवजदार हे पद कोणत्याही परिस्थितीत व्यपगत न करता आणि ऐवजदार या पदावर कार्यरत असताना मरण पावले अशांच्या वारसांना ऐवजदार कार्ड देणे इत्यादी मागण्या लोकप्रतिनिधींकडून केल्या जात असणे, ऐवजदारांच्या मागण्या प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेली नाराजीची भावना, ऐवजदार कर्मचाऱ्यांना लाड समितीच्या शिफारशींचा लाभ देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. विजय शिवतारे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे शहरातून फुरसुंगी, उरुळीदेवाची ही गावे वगळून फुरसुंगी उरुळीदेवाची नगरपरिषदेची दि.११ सप्टेंबर, २०२४ रोजी निर्मिती होणे, पुणे मनपाकडून पायाभूत सुविधा व नागरी सेवांचे नगरपरिषदेला हस्तांतरण करण्याबाबत दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नेमणूक होणे, हस्तांतरण होईपर्यंत महापालिकेने नगर परिषद हद्दीत पायाभूत सुविधा सुरू ठेवणे तसेच त्यांची दुरुस्ती व निगा राखणे यासाठी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दि.१२ ऑक्टोबर, २०२३ रोजी मनपाला आदेश देणे, नगर परिषदेने याबाबत वारंवार

मनपाकडे पाठपुरावा करूनही मनपाकडून दुर्लक्ष व दिरंगाई केली जाणे, हस्तांतरण न झाल्याने नगर परिषदेचा शेकडो कोटींचा महसूल बुडणे, नागरी सुविधांचा बोजवारा उडणे, मनपाच्या कर्मचाऱ्यांकडून नळ कनेक्शन देताना होत असलेला भ्रष्टाचार, ग्रामपंचायत कराच्या दुपटीहून अधिक कर घेऊ नये व नव्याने करधोरण निश्चित करण्याचे नगरविकास मंत्र्यांचे दि.१२ ऑक्टोबर २०२३ रोजी आदेश, मनपाकडून अद्याप आदेशाची अंमलबजावणी न होणे, मनपात पूर्णतः व अंशतः समाविष्ट गावात ८ वर्षानंतरही पाणी, रस्ते व इतर पायाभूत सुविधा देण्यात मनपाला आलेले अपयश, १९९७ साली मनपात समाविष्ट आंबेगाव भागातील डीपी रस्तेदेखील विकसित न होणे, शासन आदेशांची अंमलबजावणी न करणाऱ्या मुजोर मनपा अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची आवश्यकता, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत करावयाची कार्यवाही आणि शासनाची भूमिका."

**(८) श्री.महेश शिंदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड येथील तत्कालीन प्रभारी प्राचार्य डॉ. किशोर बुराडे व डॉ. रिता चकोले तसेच तत्कालीन भांडारपाल डी. ए. कांबळे यांच्या संगनमताने पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्टाचार केला असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, या महाविद्यालयातील कै. डॉ. फहिम जहाँगिर सयद, सहायक प्राध्यापक, या पदावर कार्यरत असतांना दि. १६.२.२०२० रोजी मृत्यू झाल्यानंतर त्यांनी घरबांधणी घेतलेल्या अग्रिमाची मुद्दल व व्याज असे एकूण १७,५५,२७३/- रु. नॉमिनीकडून वसूल करुन सदरील रक्कम दि.१९.२.२०२१ रोजी संस्थेच्या ॲक्सिस बँक, कराड खाते क्र. २४४८ मध्ये जमा करण्यात येणे, परंतु सदरची रक्कम शिल्लक नसल्याचे दिसून येणे, महाविद्यालयाची कोणत्याही प्रकारची मान्यता न घेता अकाऊंटमधून सेल्फने प्राचार्याच्या स्वाक्षरीने पैसे काढलेले दिसून येणे, शासकीय रोजनिशी वही व आहरण व संवितरण खाते पुस्तक यात खूप तफावत दिसून येणे, कराड फार्मसी स्टुडन्ट फेडरेशनचा (माजी विद्यार्थी संघटना) यांच्या कार्यक्रमांस दि. ८ फेब्रुवारी रोजी शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यात येणे, या प्रकरणी श्री.अभिषेक हरदास व श्री.अभिजित खेडकर यांचेकडून सहसंचालक कार्यालयात खोटी तक्रार दाखल करण्यात आली असणे तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांवर वेगवेगळ्या सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत खोट्या तक्रारी सह संचालकांकडे दाखल करून त्यांच्यामार्फत खुलासा विचारला जात असणे, परंतु महाविद्यालयात झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल वरिष्ठ कार्यालयाकडून कोणतीही विचारणा अथवा चौकशी करण्यात येत नसणे, महाविद्यालयात इतरही अनागोंदी कारभार झाल्याचे स्पष्टपणे दिसून येणे त्यावर कोणतीही कार्यवाही होत नसणे, याप्रकरणी शासनाने संबंधित दोषींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(९) श्री.राजेश पाडवी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नंदुरबार जिल्हा आदिवासी बहुल असणे, नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती दि. १ जुलै, १९९८ सालची असणे, मात्र आजही तालुक्यात औद्योगिक विकास झाला नसणे, परिणामी नागरिकांच्या मुख्य समस्या वाढतच असणे, त्यामुळे समाजातील दारिद्र्य, बेरोजगारी, कुपोषण, दरडोई उत्पन्न यासारख्या समस्या ऐरणीवर येणे, पर्यायाने रोजगारासाठी जिल्ह्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात पर राज्यात स्थलांतर होत असणे, जिल्ह्यातील चारही तालुक्यात साधारणत: ऑक्टोबर महिन्यापासून सुमारे जिल्ह्यातील ६०% आदिवासी कुटुंब व जिल्ह्यातील एकूण गावापैकी ५३% शहादा तालुक्यातील गावांमधून आदिवासी कुटुंब रोजगाराच्या शोधात स्थलांतर होत असणे, स्थलांतरामुळे कुटुंबांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते असणे, जिल्हा निर्मिती झाल्यापासून शासनाची उदासिनता व औद्योगिक विकासाच्या दिशेने ठोस उपाययोजना दिसून न येणे, जिल्ह्याच्या समस्यांच्या निवारणासाठी शासनाच्या वतीने औद्योगिक विकासाच्या दिशेने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(१०) श्री. राजेश विटेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, पीक विमा मिळण्याबाबत विलंब झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत येणे, परभणी जिल्ह्यातील ५२ पैकी ५० महसूल मंडळात अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असणे, विहित मुदतीत पंचनामे करणे व त्यानंतर एका महिन्यात २५% अग्रीम आर्थिक मदत देणे असा शासन निर्णय असतानाही त्यास सहा महिने उशीर होणे, तर पीक विमा मिळण्यासाठी अंतिम आणेवारी जाहीर होऊनही फेब्रुवारी २५ पर्यंत पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न होणे, त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडणे, विहित मुदतीत तसेच वेळीच आर्थिक मदत वाटप न करणे, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांना करण्यात आलेली आर्थिक मदत उशिराने मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले नाराजीचे वातावरण व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चिखली मतदारसंघातील सन २०२३-२०२४ मधील खरीप हंगामातील - १०३०३ शेतकऱ्यांचे, १२४००८५३६ (बारा कोटी, चाळीस लाख, आठ हजार, पाचशे छत्तीस रुपये) प्रलंबित असणे तसेच रब्बी हंगामातील ४७७७१ शेतकऱ्यांचे

३७८३२७७७३ (सदतीस कोटी, त्र्याऐंशी लाख, सत्तावीस हजार सातशे त्र्याहत्तर रुपये) प्रलंबित असणे. या प्रकरणी चिखली मतदार संघातील शेतकऱ्यांचा प्रलंबित पीक विमा मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) सर्वश्री. रत्नाकर गुट्टे, राजेश विटेकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी जिल्ह्यामध्ये बनावट कागदपत्रे तयार करून ४०० बनावट धान्य अधिकोष सहकारी संस्थांची नोंदणी करण्यात येणे, नोंदणी केलेल्या बनावट संस्थाद्वारे परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सभासद होऊन बँकेवर संचालक म्हणून निवडून जाण्याकरता त्याचा वापर करणे, धान्य अधिकोष संस्थांचे चुकीचे वर्गीकरण देऊन तसेच धान्य अधिकोष संस्थेचे बनावट लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा परीक्षकांना हाताशी धरून संस्थेला "ब" वर्ग मिळवून देणे, तसेच तालुकास्तरावर बँकेच्या मतदानासाठी पात्र ठरवणे, शेतकऱ्यांसाठी कर्जवाटप करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थावर बनावट धान्य अधिकोष संस्थांचा परिणाम झाल्याने त्या बुडण्याच्या मार्गावर जाणे, उक्त प्रकरणी परभणी येथील जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ यांनी १९ पानांचा सविस्तर अहवाल विभागीय सहनिबंधक संभाजीनगर यांना सादर करणे, तसेच जानेवारी, २०२२ दरम्यान सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विभागीय सहनिबंधक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी स्थापन करणे, अहवालाप्रमाणे कोणतीही सक्षम कारवाई न होता प्रकरण दडपण्यात येणे, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मधील तरतुदींप्रमाणे विहित मुदतीत प्रकरण निकाली काढणे बंधनकारक असणे, सदरील प्रकरणी कोणत्या स्तरावर व कोणी विलंब केला तसेच अहवाल कोणी दडपला याची चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई होण्याची तसेच बनावट धान्य अधिकोष सहकारी संस्था रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कारवाई व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **वने मंत्री** : महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल आणि लेखा सभागृहासमोर ठेवतील.

(२) **खनिकर्म मंत्री** : मॉयल लिमिटेड यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा बासष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

